# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## जाहिर प्रकटन

याद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अधिसभेचे सदस्य असलेले प्राचार्य, अध्यापक, व्यवस्थापन प्रतिनिधी व नोंदणीकृत पदवीधर यांच्यातून निवडून आलेले दोन प्रतिनिधी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३०(४)(च)(छ)(ज)(झ)/30(4)(f)(g)(h)(i) नुसार निवडणुकीद्वारे व्यवस्थापन परिषदेवर प्रतिनिधीत्व करणार आहेत. यापैकी प्रत्येकी एक जागा खुल्या प्रवर्गासाठी असून दुसरी जागा राखीव प्रवर्गासाठी आरक्षित असणार आहे. सदरील राखीव जागांचे आरक्षण ठरविण्याकरीता महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेला अध्यादेश क्र. १/२०१८ मध्ये, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३०(४)(च)(छ)(ज)(झ)/30(4)(f)(g)(h)(i) नुसार असलेल्या जागांकरीता राखीव प्रवर्गाचे आळीपाळीने देण्यात येणारे आरक्षण हे, कुलगुरुंकडून चिठ्ठया टाकून काढलेल्या सोडतीद्वारे ठरविण्यात येईल, अशी तरतूद आहे.

उक्त नमूद अध्यादेशातील तरतूदीनुसार मा. कुलगुरु यांनी दिनांक ८ फेब्रुवारी, २०१८ रोजी उपस्थितांच्यासमोर व्यवस्थापन परिषदेवर प्रतिनिधीत्व करणारे राखीव प्रवर्गातील प्राचार्य, अध्यापक, व्यवस्थापन प्रतिनिधी व नोंदणीकृत पदवीधर यांचे प्रारंभिक आरक्षण बिंदू चिठ्ठीद्वारे सोडत काढून खालीलप्रमाणे ठरविण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | म.सा.वि.अ., २०१६ मधील कलम | मतदार संघ | चिठ्ठीद्वारे सोडत काढून ठरविण्यात आलेले प्रारंभिक आरक्षण बिंदू |
|---|---|---|---|
| १. | ३०(४)(च)/ 30(4)(f) | प्राचार्य | इतर मागासवर्ग (OBC) |
| २. | ३०(४)(छ)/30(4)(g) | अध्यापक व विद्यापीठ अध्यापक | अनुसूचित जमाती (ST) |
| ३. | ३०(४)(ज)/30(4) (h) | व्यवस्थापन प्रतिनिधी | अनुसूचित जाती (SC) |
| ४. | ३०(४)(झ)/30(4) (i) | नोंदणीकृत पदवीधर | निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती (DT(VJ)/NT) |

उक्त नमूद केल्याप्रमाणे प्रारंभिक आरक्षण बिंदू ठरविण्यात आलेले आहेत, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(डॉ. अरविंद दिगंबर शाळिग्राम)
प्रभारी कुलसचिव

जा.क्र. : साफुपुविनि/ ५८९ )
दिनांक : ०८ फेब्रुवारी, २०१८ )

D:\Election 2017\Management Council\Circular regarding draw of lots - Chakrakram - Election 2017.docx